शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय, अनुदानित,
विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची तात्काळ पडताळणी करणेबाबतचे शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे - १, यांचे क्र. उशिसं/शिष्य-२०१९-२०/डीबीटी/१३४० दि. १ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रानुसार सन २०१९-२० मधील शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करणेसाठी शैक्षणिक संस्थांना दि. २०.०२.२०२० आणि विभागासाठी दि. २८.०२.२०२० पर्यंत शेवटची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, अशा प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी संबंधित शैक्षणिक संस्था तसेच विभाग यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

दि. ०१.०२.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड नुसार, सोबतच्या पत्रातील विभागनिहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे, तरी सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.
संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 508
दि. 07 FEB 2020

d:\2019\mangutkar\circular.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१९-२०/डीबीटी/ 1340 दि.०१/०२/२०२०
1 FEB 2020

ईमेलद्वारा

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत...**

उपरोक्त विषयाबाबत सन २०१९-२० मधील शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करणेसाठी **शैक्षणिक संस्थांना दि. २०.०२.२०२० आणि विभागासाठी दि. २८.०२.२०२०** पर्यंत शेवटची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, अशा प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी संबंधित शैक्षणिक संस्था तसेच विभाग यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

दि. ०१.०२.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड नुसार, खालील प्रमाणे विभाग निहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे.

| Sr. No. | Region | Application Received | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Dept. | Pending At Dept. | Sent back to applicant | Pending At Institute (2nd Instl.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Amravati | 7,534 | 4,792 | 1,111 | 4,792 | 0 | 467 | 865 |
| 2 | Aurangabad | 40,979 | 30,277 | 3,374 | 30,275 | 2 | 1,421 | 5,831 |
| 3 | Jalgaon | 8,046 | 5,356 | 1,168 | 5,356 | 0 | 366 | 938 |
| 4 | Kolhapur | 47,644 | 40,617 | 1,130 | 40,614 | 3 | 2,197 | 6,732 |
| 5 | Mumbai | 2,469 | 1,350 | 244 | 1,350 | 0 | 258 | 181 |
| 6 | Nagpur | 8,099 | 6,103 | 430 | 6,103 | 0 | 396 | 1,238 |
| 7 | Nanded | 25,221 | 17,752 | 2,273 | 17,694 | 58 | 1,351 | 3,509 |
| 8 | Panvel | 5,221 | 3,274 | 779 | 3,274 | 0 | 369 | 114 |
| 9 | Pune | 52,631 | 40,420 | 2,393 | 40,397 | 23 | 2,370 | 4,211 |
| 10 | Solapur | 12,749 | 10,079 | 632 | 10,077 | 2 | 807 | 2,043 |
| | Out of Maharashtra | 14 | 7 | 5 | 3 | 4 | 0 | 0 |
| **Grand Total** | | **2,10,607** | **1,60,027** | **13,539** | **1,59,935** | **92** | **10,002** | **25,662** |

**प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. त्यामुळे प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत संबंधित कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील. सदरची बाब आपल्या विभागातील सर्व अकृषि विद्यापीठे तसेच शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.**

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर इन्स्टियुट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही. महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्तरावर शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे. सदरची बाब संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयांमार्फत कळविण्यात यावी.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत : - तात्काळ कार्यवाहीसाठी.

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
२. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

प्रत : - माहितीस्तव सादर.

१. मा. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
३. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.